# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग,

## कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड

## नागरिकांची सनद

## सूची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १. | कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग नांदेड या कार्यालयाची बांधीलकी व नागरिकांची जबाबदारी | ०१ - ०२ |
| २. | विभागीय कार्यालयाची रचना | ०२ |
| ३. | कार्यपुर्तीचे वेळापत्रक | ०३ - ०५ |
| ४. | जनतेच्या गाऱ्हाण्याचे निराकरण व सनदीचा आढावा. | ०५ - ०६ |

**प्रस्तावना :**

नांदेड जिल्हयातील मार्गप्रकल्प विभाग सन १९६५ पासून कार्यरत आहे. नांदेड शहरातील सा.बा. मंडळ कार्यालय यांच्या इमारतीतील पहिल्या मजल्यावर या विभागाचे मुख्यालय आहे. सार्वजनिक बांधकाम मंडळाअंतर्गत नव्याने प्रस्तावित करण्यात येणाऱ्या रस्ते, पुल व इमारतीचे सर्वेक्षण करणे तसेच अंदाजपत्रके बनवणे, अतिवृष्टीमुळे बुडीत पुलाची उंची वाढविणे आवश्यक ठरणाऱ्या पुलाचे सर्वेक्षण व अंदाज पत्रक बनवणे ही कामे मार्ग प्रकल्प विभाग मार्फत करण्यात येतात.

नागरिकांचे सार्वजनिक बांधकाम विभागशी संबंधीत प्रश्न तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपुर्वक सोडवण्यासाठी मार्ग प्रकल्पविभाग, नांदेड कटीबध्द आहे. ही बांधीलकी या सनदेद्वारे जाहीर करण्यात येत आहे. नागरिकांचे प्रश्न सहानुभूतीपुर्वक सोडवण्याचा दृष्टिकोण ठेवून नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यात येत आहे.

१) नव्याने प्रस्तावित रस्ते /इमारती व पुलाचे अहवाल बनवणे.

२) नव्याने प्रस्थापित करण्यात येणाऱ्या रस्ते, पुल व इमारती व अतिवृष्टीमुळे बुडीत पुलाची उंची वाढवणे तसेच वळण रस्त्याची सविस्तर सर्वेक्षणकरुन अंदाजपत्रक बनविणे.

३) मार्ग रेखनसाठी चांगली नैसर्गिक पार्श्वभूमी निवडणे व आर्थिकदृष्टयाकाटकसरीचे अंदाजपत्रक बनवितांना प्रकल्प तांत्रिकदृष्टया परिपुर्ण व मार्गरेखन जास्तीत जास्त लोकांना उपयुक्त होईल याची दक्षता घेणे.

४) मार्गरेखण आर्थिकदृष्टया काटकसरीचा करतांना कमीत कमी पारगामी नि:सरणाची कामे लक्षात घेवुन अंदाजपत्रक बनविणे.

५) विभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्य व जबाबदाऱ्या फलकावर जाहीर रित्या प्रदर्शित करणे.

६) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारितीतील माहिती विनाविलंब तात्काळ संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुनदेणे.

७) कार्यालयाच्या कामाकाजात सातत्याने तत्परता ठेवून व संगणकृती अद्यावती करणाद्वारे व नविन तंत्रज्ञानाने आधुनिकता आणुन या विभागाची तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

८) विभागीय कार्यालय तसेच विभागाअंतर्गत उपविभाग संगणीकृत करुन तातडीची माहिती स्थानिक भाषेत मराठीत त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहाणे.

९) विभागाअंतर्गत अद्यावत माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध करणे.

१०) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

११) या कार्यालयामध्ये सर्व अभिलेख अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

**२) मार्गप्रकल्प विभाग नांदेड या कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी :**

वरील सर्व कर्तव्य पार पाडतांना मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड

१) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी, पारदर्शकता व कर्तव्यपरायणता ठेविल.

२) सौजन्यपुर्ण व मदतीची भावना ठेवून कामाच्यावेळेत निपटारा व अंमलबजावणी करेल.

३) कार्यप्रणालीमध्ये गतिमानता प्रगतीद्वारे शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवून पारदर्शकता व निष्ठा ठेवेल.

**नागरिकांची जबाबदारी :**

१) शासकीय अधिकारी, कर्मचारी त्यांच्याशी नागरिकांची वर्तुणुक सौहार्दपूर्ण, सहकार्याची,सौजन्यपूर्णतेची, सहानुभूती, व्यक्तिसंबंधी अपकृती न करणारी असावी.

२) विहित केलेल्याकालावधीपेक्षा कमी कालावधीमध्ये सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

३) नागरिकांनी कायदेशिर तरतुदी, कायदेशिर नीतीवचने, नियम तसेच अलिखित संकेत यांचे पालन करावे.

४) नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहाकार्याची भावना ठेवावी.

**मार्गप्रकल्प विभाग नांदेड कार्यालयाची रचना :**

१) कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड कार्यालयाशी शासनाने नांदेड या मुख्यालयाचे ठिकाण सन १९६५ रोजी स्थापना केली आहे. कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग नांदेड अंतर्गत, मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. १ नांदेड, मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. २ नांदेड, मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. .१ परभणी, मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. २ परभणी अशी एकूण चार उपविभागीय कार्यालये आहेत. नांदेड जिल्ह्यातील व परभणी जिल्ह्यातील नमुद केल्या प्रमाणे तालुकानिहाय कार्यक्षेत्र उपविभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये येते.

| **अ.क्र.** | **उपविभागाचे नांव** | **तालुका** |
|---|---|---|
| **१.** | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. १ नांदेड | लोहा, कंधार, बिलोली, मुखेड, देगलूर, नायगांव |
| **२.** | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. २ नांदेड | हदगांव, भोकर, किनवट, अर्धापूर, हिमायतनगर, धर्माबाद, |
| **३.** | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. १ परभणी | गंगाखेड, पाथरी, मानवत, पालम, |
| **४.** | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. २ परभणी | कळमनुरी, हिंगोली, औंढा, सेनगांव, |

विभागाअंतर्गत एकूण चार उपविभाग कार्यरत आहेत. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग नांदेड, कार्यालयाचा कार्यक्षेत्राचानकाशा नागरिकांचे सनदीचे सुरुवातीला दर्शविण्यात आलेला आहे.

या विभागाअंतर्गत कामाच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली, लेखासंहिता, वेळोवेळी निर्गमित परिपत्रके इ. ची काटेकोरपणाने पालन क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून केले जाते.

**मुख्यालय दर्शविणारा तक्ता :**

| अ.क्र. | मुख्यालयाचे नांव | मुख्यालय |
|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड | नांदेड |
| २. | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. १ नांदेड | नांदेड |
| ३. | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. २ नांदेड | नांदेड |
| ४. | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. १ परभणी | परभणी |
| ५. | मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. २ परभणी | परभणी |

**विभागाअंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सूलभता.**

**अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक.**

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | नव्याने प्रस्तावित करणेत आलेले रस्ते, इमारती व पूल यांचे सर्वेक्षण करणे. | कार्यकारी अभियंता तसेच उपअभियंता | ६० दिवस |
| २. | माहिती अधिकारात मागणेत आलेली माहिती. | शासकीय माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेपासून ३० दिवसात |
| ३. | माहिती अधिकारांतर्गत प्राप्त अपिलिय अर्ज | अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेपासून ४५ दिवसांत |

**ब)    माहितीची सुलभता**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (www.mahapwd.com) या संकेतस्थळावर वेळोवेळीसादर केली जाणारी माहिती जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**३)    गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांच्यासूचना**

**अ)    गाऱ्हाणी /तक्रारी यांचे निराकरण.**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी विभागाअंतर्गत कामाबाबत काही तक्रारी असतील तर त्यासाठी नागरीकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ उपविभागीय कार्यालया विरुध्द गाऱ्हाणे/तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे व तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी / तक्रारींचे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे व तक्रारनोंदवावी. अशा गाऱ्हाणी / तक्रांरीचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल. गाऱ्हाणी/ तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने अथवा ई मेलद्वारे नागरिकक मांडू शकतात.

**ब)    नागरिकांच्यासनदेचा आढावा / सिंहावलोकन**

याविभागाच्या नागरिकांच्यासनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा मार्ग प्रकल्प विभाग, सातारा अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क)    जनसामान्यांकडून सूचना :**

या विभागाची नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननिय नागरीकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभीर्य पूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरीकांची सनद स्वत:हूनकाही

नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरीकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**ड) नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी :**

मार्ग प्रकल्प विभागांतर्गत नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास विभागीय कार्यालय कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्यासूचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील. मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. हया विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरीकांना संवेदनशील, सौजन्यपुर्वक व मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल तसेच नागरीकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.